# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. : काऔसंवि/ब/वैप्र/६११

दिनांक :०५/०१/२००९

## परिपत्रक

विषय : कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यास वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे क्षेत्रीय कार्यकारी संचालक यांचे अधिकार सांघिक कार्यालयातील कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन) यांना प्रदान करण्याबाबत.

**********

प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९ दि. १९/०५/२००६ अन्वये कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना रु. ३०००१/- व त्यापेक्षा अधिक रकमेच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे अधिकार मुख्य कार्यालयातील कार्यकारी संचालक (एक) / कार्यकारी संचालक (दोन) / कार्यकारी संचालक (तीन) यांना प्रदान करण्यात आले होते. तथापि, कंपनीच्या प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टिकोनातून कार्यकारी संचालक (एक)/ (दोन) / (तीन) यांची अनुक्रमे कल्याण, पुणे व नागपूर मुख्यालय येथे पदस्थापना झाल्यामुळे सांघिक कार्यालयात प्राप्त होणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजुरीस होणारा विलंब टाळण्यासाठी आता प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९ दि.१९/०५/२००६ मध्ये अंशतः फेरबदल करुन व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन रु.३०००१/- व त्यापेक्षा अधिक रकमेच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजुरीचे अधिकार कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन), सांघिक कार्यालय, मुंबई यांना प्रदान करण्यास मान्यता दिली आहे.

प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९ दि. १९/०५/२००६ मध्ये अन्य कोणताही बदल नाही. तसेच सदरचे परिपत्रक त्वरीत अंमलात येईल व ते महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी लागू राहील.

किशोर पवार.
प्रभारी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रति,
कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांना
म.रा.विद्युत वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

E:\Backup Of Meena\D Drive\Meena\pdraja\apaghta pratipurti.doc